**बाब क्रमांक २६९/२**

**विषय :- Approval for DPR under MHADA Computerization.**

------------------------------------------

**ठराव क्रमांक : ६७२७** **दिनांक : २७/१०/२०१६**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

१. Detail Project Report याला सदस्यांनी मान्यता दिली.

२. तसेच MASTEK एजन्सी यांचा करारनामा कायम स्वरुपी रद्द करुन **MHADA Computerization.** करणेकरिता नव्याने निविदा काढणेस सूचना व मान्यता दिली

३. नव्याने संगणकीकरण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या DPR (Detail Project Report) तसेच निविदा इ. बाबत आय.आय.टी. किंवा व्ही.जे..टी. आय. किंवा व राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामधील तज्ञांचा सल्ला घ्यावा व त्यानंतर (**MHADA Computerization**) संगणकीकरणाचा कार्यक्रम अंतिम करावा.

४. मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांनी संगणकीकरणाचा कार्यक्रमांसाठी (**MHADA Computerization**) आवश्यक असरणा-या निधीची तरतूद करुन, संगणकीकरणाचा कालबध्दरित्या कार्यक्रम आखून तो पुर्णत्वास न्यावा. व संगणकीकरणासाठी आवश्यक निधी खर्च उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांनी मंजूर करावा. त्यांचे नियोजन करावे व कार्यक्रम पूर्ण करावा.

वरील सूचनेच्या अधिन राहून **DPR under MHADA Computerization.** या ठरावास मान्यता देण्यात येत आहे.

C:\Adm.2011-2012\Adm.5\Format\161

**बाब क्रमांक २६९/३**

**विषय :-** **मुंबई शहरावरील दिनांक २६/११/२००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात गौरवशाली कामगिरी केलेले वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.भागवत बनसोडे यांच्या पत्नी श्रीम.मंगल बनसोडे यांना " विशेष बाब " म्हणून सोडत २०११ मधील संकेत क्र.२६७ प्राधान्य क्र.SC/१६ अन्वये वितरीत करावयाच्या सदनिकेची व्याजाची रक्कम माफ करुन मिळण्याबाबत.**

-----------------------------------------------------

**ठराव क्रमांक : ६७२८** **दिनांक : २७/१०/२०१६**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, मुंबई शहरावरील दि.२६/११/२००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात गौरवशाली कामगिरी केलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. भागवत कचरू बनसोडे यांच्या पत्नी श्रीम. मंगल भागवत बनसोडे यांना "विशेष बाब" म्हणून सोडत २०११ मधील संकेत क्र. २६७ प्राधान्य क्र. SC/१६ अन्वये वितरीत करावयाच्या सदनिकेच्या व्याजाची रक्कम माफ करण्याची शिफारस शासनास करण्यात येत आहे. तसेच यासाठी होणारा एकूण खर्च रुपये १७,९७,९८८/- म्हाडाच्या निधीतून समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २६९/५**

**विषय :- म्हाडामधील अधिकारी / कर्मचा-यांना सन २०१५-१६ या वर्षाकरिता सानुग्रह अनुदान मिळणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६७२९** **दिनांक : २७/१०/२०१६**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडील अधिकारी / कर्मचारी तसेच म्हाडात प्रतिनियुक्तीने असलेल्या राज्यशासनाडील वर्ग-१ व त्यावरील अधिका-यांना तसेच म्हाडातील प्रतिनियुक्तीवरील अन्य अधिकारी / कर्मचारी यांना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता प्रत्येकी रु. १३,५००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून अदा करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

सदर सानुग्रह अनुदान दिनांक ०१/१०/२०१६ रोजी कार्यरत असलेले व किमान ६ महिने सेवाकालावधी पूर्ण झालेल्या प्राधिकरण विभाग, विभागीय मंडळामध्ये व प्रतिनियुक्तीवरील अधिकारी व कर्मचारी यांना देय राहील.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.